## // प्रेस नोट //

दिनांक २८/०९/२०१८

**अशोक सदाशिव हजारे, वय २६ वर्षे, धंदा तलाठी मदतनिस,सज्जा खडकी देवळा, रा.कासारी, ता.केज, (खाजगी इसम), यांनी ३०,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.०५/०९/२०१८ रोजी तक्रारदार यांनी ऐसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की,यांची मौजे खंडोबाची वाडी येथे वडिलोपार्जीत जमिन असून सदरची जमिन तक्रारदार,त्यांचा भाऊ व आई यांचे नावे करण्यासाठी तलाठी हजारे व त्यांचा मदतनिस ३०,०००/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन वडवणी येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता तलाठी हजारे यांचा मदतनिस अशोक हजारे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक २८/०९/२०१८ रोजी अशोक हजारे यांचे विरुध्द वडवणी ते चिंचवण रोडवर हॉटेल मेघराजचे परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता अशोक हजारे (तलाठी मदतनिस) यांना तक्रारदार यांचेकडून ३०,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असून **अशोक सदाशिव हजारे, वय २६ वर्षे, (खाजगी इसम) धंदा तलाठी मदतनिस,सज्जा खडकी देवळा, रा.कासारी, ता.केज जि.बीड** यांचेविरुध्द पोस्टे वडवणी येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (सुधारणा) २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक ऐसीबी औरंगाबाद, मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, ऐसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील,पोह/दादासाहेब केदार,अशोक ठोकळ,पोना/विकास मुंडे, अमोल बागलाने,पोशि सखाराम घोलप यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२४४२/२२२६४९ |
| मेल आयडी | :- | dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- | www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

**(बाळकृष्ण हनपुडे पाटील)**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.